# ।। बिजे इन्दे को संवाद ।।

## मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:–    रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

अथ बिजे इन्दे को संमाद लिखंते ।।

संत सुखरामजी ने बिजे इन्दे बुझियो । छंद व इन्द व ।।

गिगन को करे मोल ।। पवन को करे तोल ।। रवि को रहावे अडोल ।।
हे कोई अेसो नर रे ।। पत्थर को काते सूत ।। बांझ को खिलावे पूत ।।
धुन मे बोलावे भूत ।। हे कोई जन रे ।। बिजली को करे ब्याह ।।
दध कूं रखे ठाहा ।। इनका करे अर्थ ।। सोई हमारा गुरू रे ।।

अर्थ ।।

गिगन को अमोल मोल ।। पवन को नहि रत्ति तोल । बिजली सो ब्रम्ह जाण ।।
नाँव उदे होय परणे आण । उलट प्राण चढे देह माँय । सूरज रथ जब थूम्बो जाय
दिल पत्थर भजन होय ।। सूत सोई कत्ते जोय ।। पंच भूत अे देहे थाय ।।
नाड नाड सो बोले आय । बांझ नार सुण सुरत होय ।शब्द पूत सो रमे जोय
अगम घर जहाँ जाय प्राण । दध कूं मथे सो थुम्बे आण । ये अर्थ या को होय
सुण बिजा कहुँ तोय ।। जाणसी संत जाँके समाय । कयां सु सुख आवे नाय ।
जाय शबद उलट जोय ।। सर्ब अर्थ या पारख होय ।।

आदि सतगुरू सुखरामजी महाराजांनी बिजे इंदाला उत्तर दिले.

१ प्रश्न :– गगनाची किंमत करा?

उत्तर :– गगनाची किंमत अनमोल आहे.

२ प्रश्न :– वायुचे वजन करा?

उत्तर :– वायुचे रतीभरही वजन नाही.

३ प्रश्न :– सुर्याला न डोलणारा अडोल करून देणारा कोणी आहे काय?

उत्तर :– समाधि मध्ये संताचे प्राण बंकनाल कडून उलटून देहात दहाव्याद्वारात चढून जातो तेंव्हा सुर्य त्रिगुटीत न डोलणारा अडोल होऊन जातो.

४ प्रश्न :– असा कोणी मनुष्य आहे का,जो दगडाचे सुत कातेल?

उत्तर :– हे मन आहे ते दगड आहे,या मनाने राम भजन करणे हे दगडाचे सुत कातण्या सारखे आहे.दगड म्हणजे मन आणि सुत कातणे म्हणजे भजन करणे हेच दगडाचे सुत कातणे आहे.

५ प्रश्न :– वांझ स्त्रीचा पुत्र खेळवा?

उत्तर :– वांझ स्त्री ही सुरत आहे आणि सतशब्द हा तिचा पुत्र आहे,ही सुरत श्वासावर सुरत शब्दाला खेळवते,हेच वांझ स्त्रीचा पुत्र खेळवणे आहे.

६ प्रश्न :– ध्वनिच्या भुताला बोलण्यास बाध्य करणारा कोणी संत आहे का?

उत्तर :– हा देह पाच भूतांचा बनलेला आहे,राम नामाचे भजन केल्याने संताच्या

देहात नाडी नाडीतून (नसा नसात)ररंकाराची ध्वनि होऊ लागते,अशाप्रकारे ध्वनि पासून पाच भुत बोलू लागतात.

७ प्रश्न :– विजेचा विवाह करा?

उत्तर :– विज ही विरह आहे,राम नामाचा उदय होतो तेंव्हा विरहीणी रूपी विजेचा विवाह होऊन जातो.

८ प्रश्न :– दह्यास ठिकाणावर(जागेवर)ठेवा?

उत्तर :– प्राणाला अगम घरी पोहोचवून अगमच्या घरी म्हणजे ब्रम्हंडात थांबविणे,हेच दह्याला थांबविणे आहे,बीजा ऐक,मी तुला सांगतो की,ज्या संताच्या आंत हे झाले आहे,होत आहे,तोच याला जाणेल,हे सांगण्याने व ऐकण्याने सुख येणारी कुद्रत नाही आहे,ही कुद्रत ज्याला झाली आहे,तोच संत याला जाणेल,ज्याचा शब्द उलटून बंकनाळच्या रस्त्याने वर जाईल,त्यालाच या अर्थाची सर्व पारख आहे,

कुंडल्यो ।।

**सुखराम दास अे अर्थ रे ।। चवड़े किया बजाय ।। सतगुरू मीलिया पाईये ।।**
**सुण बिजा तन मांय ।। सुण बिजा तन मांय ।। आप में ता दिन आवे ।।**
**सतगुरू रूपी संत ।। ताय के चरणा जावे ।। ओर गुरू दस लाख कर ।।**
**गरज सरे नहीं काय ।। सुखराम दास अे अर्थ रे ।। चवड़े किया बजाय ।।१।।**

आदि सतगुरू सुखरामजी महाराज सांगतात की,याचा अर्थ मी तुला स्पष्ट करुन सांगून दिला,जेंव्हा तुला सतगुरू मिळतील तेंव्हा बीजा,तुझ्या शरीरात ही गोष्ट दिसेल, जेंव्हा तू सतगुरू रूपी संताच्या चरणांत जाशील,त्यादिवशी तुला हे सर्व शरीराच्या आतच भेटून जाईल,तू सतगुरूशिवाय दुसरे दहा लाख ही गुरू केले तरीही,सतगुरूच्या शिवाय तुझी गरज पुर्ती होणार नाही आहे,असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले.

।। इति बिजा इन्दे को संमाद संपूरण ।।